# न्यूज एक्सप्रेस मराठी

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दि. 29 सप्टेंबर 2024 | पान- 1


# विधानसभेच्या निवडणुका नोव्हेंबरपूर्वीच होणार

## विद्यमान महाराष्ट्र विधानसभेचा कार्यकाळ 26 नोव्हेंबर रोजी संपत आहे : मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी दिली माहिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

विद्यमान महाराष्ट्र विधानसभेचा कार्यकाळ 26 नोव्हेंबर रोजी संपत आहे. त्यामुळे विधानसभेच्या निवडणुका 26 नोव्हेंबर पूर्वीच पार पडतील, असे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी सांगितले.




केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्राचा दौरा केला. यानंतर निवडणूक आयोगाचे प्रमुख राजीव कुमार यांनी आज (शनिवारी) पत्रकार परिषद घेतली. लोकांना मते देताना कुठलीही अडचण होणार नाही याची दक्षता घ्यावी. जे मतदार फोन घेऊन येतात त्यांना तो सोडून जाताना आणि परत नेताना अडचणी येतात. त्याची व्यवस्था करावी अशीही विनंती करण्यात आली. पैशांचा गैरवापर, मसल पॉवर रोखण्याचीही विनंती केली. वृद्ध लोकांच्या येण्याची-जाण्याची व्यवस्था करावी अशीही विनंती करण्यात आली. पोलिंग एजंट हा स्थानिक असावा अशीही विनंती राजकीय पक्षांनी केल्याचे राजीव कुमार यांनी सांगितले.महाराष्ट्रात 9.59 कोटी मतदार आहेत. त्यात पुरुष 4.59 कोटी मतदार आहेत. तर महिला 4.64 कोटी आहेत.

आम्ही तृतीय पंथीय, वृद्ध मतदार, दिव्यांग यांची विशेष व्यवस्थाकरणार आहोत. वृद्ध मतदारांना मतदान करण्यासाठी विनंती करतो. त्यांना केंद्रात जाणे शक्य नसेल तर घरुन मतदान करण्याची सोय उपलब्ध करुन दिली जाईल. पहिल्यांदा मतदान करणाऱ्या मतदारांची संख्याही महाराष्ट्रात चांगली आहे. 19.48 लाख मतदार हे नवमतदार असल्याचेही राजीव कुमार यांनी सांगितले. निवडणूक आयोगाने राजकीय चिन्हांबाबत आधीच निर्णय दिलेले आहेत.

ज्या पक्षांचे दोन गट आहेत, त्यांना आम्ही त्यांच्या विनंतीनुसार इतर चिन्ह दिले आहेत. मात्र राष्ट्रवादी कॉंग्रेसचा विषय न्यायप्रविष्ट असल्यामुळे त्यांच्या चिन्हाबाबत आताच काही सांगू शकत नाही, असेही कुमार म्हणाले.




# ‘इंद्रायणी थडी महोत्सव’च्या बूकिंगसाठी बचतगटांचा उत्स्फूर्त प्रतिसाद !

## शिवांजली संखी मंचच्या पुढाकाराने अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु : महिला सक्षमीकरणाठी भाजपा आमदार महेश लांडगे यांचा उपक्रम

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील ‘रेकॉर्ड ब्रेक’ इंद्रायणी थडी महोत्सवाला यावर्षीसुद्धा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या महोत्सवामध्ये स्टॉल लावण्यासाठी महिला बचतगटांनी अवघ्या आठ दिवसांत ३ हजारांहून अधिक अर्ज घेतले आहेत.

‘महिला सक्षमीकरण आणि उद्योजकता विकास” या उद्देशाने भोसरी विधानसभा मतदार संघातील भारतीय जनता पार्टीचे आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून आणि शिवांजली सखी मंचच्या अध्यक्ष पुजा लांडगे यांच्या पुढाकाराने भोसरी येथील गावजत्रा मैदानावर प्रतिवर्षी “इंद्रायणी थडी महोत्सव” आयोजित केला जातो.

भोसरी आणि परिसरातील महिला बचत गटांना हक्काचे व्यासपीठ मिळावे. महिलांना आर्थिक सक्षम करण्यासाठी उद्योजकतेला प्रोत्साहन द्यावे.या करिता आयोजित केला जाणारा महोत्सव महाराष्ट्रातील सर्वाधिक उलाढाल आणि अफाट गर्दीचा म्हणून ओळखला जातो. इंद्रायणी थडी महोत्सवासाठी भोसरी विधानसभा मतदार संघातील महिला बचत गटांना यावर्षी प्राधान्य देण्यात येणार आहे.




### अर्ज प्रक्रिया आणि लकी ड्रॉ द्वारे स्टॉल वाटप...

» दि. २१ सप्टेंबर रोजी स्टॉल बुकींगचे अर्ज वाटप सुरू करण्यात आले. अर्ज वाटपाची मुदत ३० सप्टेंबरपर्यंत आहे. आमदार महेश लांडगे यांचे मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालय, भोसरी येथे अर्जवाटप करण्यात येत आहे. सुरुवातीच्या आठवडाभरात ३ हजारहून अधिक अर्ज वापट करण्यात आले आहेत. या महोत्सवामध्ये एकूण १ हजार स्टॉल वाटप करण्यात येणार असून, स्टॉल पूर्णतः मोफत देण्यात येणार आहेत. दि. १ ते ५ ऑक्टोबर २०२४ पर्यंत अर्ज दाखल करण्याची मुदत आहे. अर्ज भरुन सोबत बचत गटांची यादी भरुन द्यावी लागणार असून, त्यानंतरच अर्ज जमा करण्यात येणार आहे. तसेच, इंद्रायणी थडी महोत्सवाचे वेळापत्रक लवकरच जाहीर करण्यात येईल, असे आवाहन करण्यात आले आहे.

### खाद्य मेजवाणीसह विविध स्पर्धा...

» इंद्रायणी थडी महोत्सवामध्ये शाकाहारी व मांसाहारी खाद्य मेजवाणीसह विविध स्पर्धा आयोजित केल्या जातात. यामध्ये डान्स, फॅशन शो, गायन, मंगळागौर खेळ, फिटनेस, फॅन्सी ड्रेस, रांगोळी, मेहंदी, रिल्स, काव्य, फोटोग्राफी, बेस्ट मेकअप आर्टिस्ट , शॉर्ट फिल्म, एकपात्री, मेमरी टेस्ट, स्वच्छ सोसायटी अशा स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धेत सहभागी होण्याकरिता दि. २५ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर २०२४ दरम्यान अर्ज मिळणार आहेत. अर्ज जमा करण्याची मुदत दि. ६ ते १० ऑक्टोबर २०२४ पर्यंत आहे.

> महिला सक्षमीकरण आणि उद्योजकता प्रोत्साहन देण्याकरिता प्रतिवर्षी ‘इंद्रायणी थडी’ चे आयोजन केले जाते. यावर्षीसुद्ध भव्य-दिव्य नियोजन करण्यात येणार आहे. महिला बचत गटांनी दिलेल्या प्रचंड प्रतिसादामुळे अल्पावधीत हा महोत्सव लोकप्रिय झाला आहे. चार-पाच दिवसांत महोत्सवाला लाखो नागरिक भेट देतात. कोट्यवधी रुपयांची उलाढाल होते. त्यामुळे महिला बचत गट आणि विविध लघु उद्योजकांना प्रोत्साहन मिळते. पावसाचा अंदाज, शाळांच्या परीक्षा आदी बाबींचा अंदाज घेवून, महोत्सवाचे वेळापत्रक जाहीर करण्यात येणार आहे.
>
> - महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# माझी वसुंधरा अभियान 4.0 : पिंपरी चिंचवड महापालिकेचा प्रथम क्रमांक, मिळविले आठ कोटींचे बक्षिस

## गुणानुक्रमानुसार सर्वोत्तम ठरलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये राज्यस्तरीय अमृत गटात पिंपरी चिंचवड महानगर पालिकेनचा प्रथम क्रमांक

**पिंपरी | प्रतिनिधी**

पृथ्वी, वायू, जल, अग्नी, आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर आधारित “माझी वसुंधरा अभियान” हे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दिनांक २ ऑक्टोबर, २०२० राबविण्यास सुरवात झाली. “माझी वसुंधरा अभियान ४.०” हे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दिनांक १ एप्रिल, २०२३ ते दिनांक ३१ मे, २०२४ या कालावधीत राबविण्यात आले होते. माझी वसुंधरा अभियान ४.० मध्ये राज्यातील ४१४ नागरी स्थानिक संस्था व २२,२१८ ग्राम पंचायती अशा एकूण २२,६३२ स्थानिक संस्थांनी सहभाग घेतला होता. गटातील विजेते तसेच, महसूल विभाग व जिल्ह्याच्या एकूण कामगिरी वरून सर्वोत्तम विभागीय आयुक्त, सर्वोत्तम जिल्हाधिकारी व सर्वोत्तम मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची शासनाच्या मान्यतेनंतर निवड करण्यात आली आहे. “माझी वसुंधरा अभियान ४.०” चा अंतिम निकाल खालील प्रमाणे जाहीर करण्यास शासनाने आज मान्यता दिली आहे.



गुणानुक्रमानुसार सर्वोत्तम ठरलेल्या १० लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये राज्यस्तरीय अमृत गटात पिंपरी चिंचवड महानगर पालिकेने प्रथम क्रमांक तर नवी मुंबई महानगर पालिकेने दुसरा तर ठाणे महानगर पालिकेने तिसरा क्रमांक मिळविला आहे. शासन मान्यतेनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांनिहाय बक्षिसांच्या रक्कमेचे वाटप शासन निर्णयानुसार सदर बक्षिसांसाठी येणारा एकूण खर्च रुपये २२४.५० कोटी (रूपये दोनशे चोवीस कोटी पन्नास लक्ष फक्त) एवढा असून, सदरचा खर्च सुरवातीस महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडील निधी मधून करण्यास येणार आहे. माझी वसुंधरा अभियानासाठी आवश्यक निधी अर्थसंकल्पीत झाल्यानंतर त्याची प्रतीपूर्ती महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास करण्यात येणार आहे.

बक्षिसांच्या रकमेचा विनियोग व कार्यपध्दती..

((१) बक्षिस रकमेतून घ्यावयाच्या उपाय योजनाः सदर बक्षिस रक्कमेचा विनियोग हा निसर्गाच्या पंचतत्वांचे संरक्षण, संवर्धन व जतन करण्यासाठीच्या उपाय योजना हाती घेण्यासाठी करण्यात यावा. सदर उपाय योजनांपैकी काही उपाय योजना उदाहरणा दाखल खाली नमूद केल्या आहेतः-

१) शहराचे / गावाचे हरित अच्छादन वाढविण्यासाठी करावयाच्या उपाय योजना (जैवविविधतेच्या संवर्धनासह) उदा.:-

(अ) मियावाकी वृक्षारोपण(ब) अमृत वनक) स्मृती वने( ड) शहरी वने(इ) सार्वजनिक उद्याने

२ ) जुन्या हरित क्षेत्रांचे संवर्धन आणि देखभाल (जैवविविधतेच्या संवर्धनासह)३ ) रोप वाटीकांची निर्मिती४) जलसंवर्धनाचे उपक्रम५) रेन वॉटर हारवेस्टिंग व परकोलेशन६) नदी, तळे व नाले यांचे पुनःजिविकरण७ ) नूतनीकरणयोग्य उर्जा स्त्रोतांच्या वापरास प्रोत्साहन देण्याच्या उपाय योजना८) सौरउर्जेवर चालणारे / एलईडी चालणारे दिवे९) विद्युत वाहनांना प्रोत्साहन- चार्जिंग पॉईंट उपलब्ध करून देणे,१०) माझी वसुंधरा अभियानांतर्गत घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धाच्या विजेत्यांना बक्षिस देणे

# गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांबाबत कठोर नियम

## उमेदवारांना आणि पक्षाला तीन दिवस प्रिंट मीडिया आणि इलेक्ट्रॉनिक मिडियात जाहिरात द्यावी लागणार आहे.



**पुणे | प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांना आणि पक्षाला तीन दिवस प्रिंट मीडिया आणि इलेक्ट्रॉनिक मिडियात जाहिरात द्यावी लागणार असल्याची माहिती मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी दिली. कुमार म्हणाले की, ज्या उमेदवारांवर तीन गुन्हे दाखल असतील. त्या उमेदवारांना प्रिंट मीडिया आणि इलेक्ट्रॉनिक मीडियामध्ये जाहिरात प्रसिद्ध करुन त्याबाबत डिक्लरेशन द्यावे लागेल. याशिवाय त्या पक्षांनाही अशा गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवाराला का उमेदवारी दिली, याची अशीच जाहिरात द्यावी लागेल. तीन दिवस पक्ष आणि उमेदवाराला जाहिरात प्रसिद्ध करावी लागेल. अन्यथा त्या उमेदवारावर कारवाई करण्यात येणार आहे. राज्यामध्ये 288 विधानसभा मतदारसंघ असून 1 लाख 186 पोलिंग बूथ आहेत. तसेच 9.53 कोटी मतदार आहेत. यामध्ये पुरुष मतदार 4.93 कोटी तर स्त्री मतदार 4.60 कोटी आहेत. राज्यात खुल्या प्रवर्गासाठी 234 मतदारसंघ आहेत. तर 25 मतदारसंघ एसटी आणि 29 मतदारसंघ एससीसाठी राखीव आहेत.

# शहरात होणार रोजगार सर्वेक्षण

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत 176 उमेदवारांना नियुक्ती : प्रशिक्षण पूर्ण झालेल्या उमेदवारांकडून सर्वेक्षणाला सुरुवात

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्यातील युवकांना शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची नोकरी मिळण्याची क्षमता वाढवण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभाग, महाराष्ट्र शासनाने 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' जाहीर केली. चालू आर्थिक वर्षापासून युवकांना प्रशिक्षण देण्यासाठी योजना सध्या राज्यभर राबवण्यात येत आहे.



मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत बारावी, आय.टी. आय., पदविका, पदवी व पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलेल्या रोजगार इच्छुक उमेदवारांना सहा महिने कालावधीसाठी प्रशिक्षणार्थी म्हणून विद्यावेतन देण्यात येणार आहे. सदरची रक्कम शासनामार्फत थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) द्वारे प्रशिक्षणार्थींच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येणार आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचा समाज विकास विभाग व लाईटहाऊस कम्युनिटी फाउंडेशन संयुक्तरित्या महापालिका क्षेत्रामध्ये रोजगार सर्वेक्षण राबवत आहे. सर्वेक्षणाच्या माध्यमातून १८ ते ४० वयोगटातील युवकांच्या आकांक्षा, आव्हाने आणि शैक्षणिक पार्श्वभूमी समजून घेण्यात येणार आहे.

**२४१ फिल्ड सर्वेक्षण प्रगणकांद्वारे**

महापालिकेच्या क्षेत्रातील लाखांहून अधिक कुटुंबांचा सर्वेक्षणामध्ये समावेश असून २४१ युवकांच्या मदतीने झोपडपट्टी क्षेत्र, कमी उत्पन्न गट याचबरोबर गावठाण क्षेत्रांमध्ये सर्वेक्षण करण्यात येणार आहे. सर्वेक्षणासाठी 'फिल्ड सर्वेक्षण प्रगणक' पद निर्माण केले असून त्यासाठी २४१ जागा निश्चित करण्यात आल्या आहेत. सदर सर्वेक्षणाच्या माध्यमातून महापालिका क्षेत्रातील ठोस माहिती मिळणार असून त्याआधारे कौशल्य विकास व युवकांच्या रोजगाराविषयी प्रभावी निर्णय घेता घेऊन त्याआधारे धोरणे विकसित करता येणार आहेत. जे कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम आणि रोजगाराच्या संधी देताना स्थानिक लोकसंख्येच्या गरजांशी सुसंगत असणार आहेत. सदर सर्वेक्षणाच्या माध्यमातून रोजगार इच्छुक उमेदवारांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव व प्रशिक्षण मिळणार असून याद्वारे त्यांची क्षमता वाढण्यास मदत होणार आहे. 'फिल्ड सर्वेक्षण प्रगणक' या पदासाठी १७६ उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली असून त्यापैकी ६६ उमेदवार रुजू झाले आहेत. रुजू झालेल्या उमेदवारांपैकी २० उमेदवारांच्या बॅचचे प्राथमिक प्रशिक्षण पूर्ण झाले असून सोमवारी (दि. २३) त्यांच्याद्वारे सर्वेक्षणाच्या कामास सुरुवात झाली आहे. त्याचबरोबर, दुसऱ्या बॅचचे प्रशिक्षणाससुध्दा सुरुवात झाली आहे. शहरात सुरू असलेल्या सर्वेक्षणामध्ये शहरातील युवकांनी आवश्यक असलेली माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन समाज विकास विभागातर्फे करण्यात आले आहे.

> ‘मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने’ अंतर्गत बारावी, आयटीआय, पदविका, पदवी व पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलेल्या रोजगार इच्छुक उमेदवारांना सहा महिन्यांच्या कालावधीसाठी प्रशिक्षणार्थी म्हणून महानगरपालिकेमध्ये घेण्यात येणार आहे. सदर प्रशिक्षण कालावधीमध्ये विद्यावेतन देण्यात येणार असून त्यांना शासनामार्फत डीबीटीद्वारे थेट बँक खात्यामध्ये जमा करण्यात येणार आहे. शहरातील युवकांच्या कौशल्य विकासासाठी व रोजगार निर्मितीसाठी महापालिका सदैव तत्पर असून शहरातील जास्तीत जास्त नागरिकांनी याचा लाभ घ्यावा.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, महानगरपालिका.**

> ‘फिल्ड सर्वेक्षण प्रगणक’ या पदासाठी १७६ उमेदवारांना नियुक्ती देण्यात आलेली आहे. त्यापैकी ६६ उमेदवार रुजू झाले आहेत. त्यापैकी २० उमेदवारांच्या बॅचचे प्राथमिक प्रशिक्षण पूर्ण झाले असून सोमवार, दिनांक २३ सप्टेंबर रोजीपासून त्यांच्याद्वारे शहरामध्ये सर्वेक्षणास सुरुवात करण्यात आली आहे.
>
> **- तानाजी नरळे, साहाय्यक आयुक्त, समाज विकास विभाग, महानगरपालिका.**

# मुकाई चौकातील रखडलेल्या रस्त्याचे रुंदीकरण सुरू

## भक्ती-शक्ती ते मुकाई चौक या बीआरटी कॉरिडॉरवरील 45 मीटरनुसार उर्वरित रस्ता विकसित करण्यात येणार आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

निगडीच्या भक्ती-शक्ती ते मुकाई चौक या बीआरटी कॉरिडॉरवरील ४५ मीटरनुसार उर्वरित रस्ता विकसित करण्यात येणार आहे. या रस्त्याच्या रुंदीकरण कामास सुरुवात करण्यात आली आहे. या रस्त्याचे काम पूर्ण झाल्यावर सदरचा रस्ता ४५ मीटर रुंदीच्या पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होणार आहे. त्यामुळे मुंबईकडे जाणारी किवळे येथील माळवले नगर या ठिकाणची वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटून वाहतूक सुरळीत होण्यास मदत होईल, असे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांनी सांगितले.



पिंपरी-चिंचवड महानगर-पालिकेच्या स्थापत्य प्रकल्प विभागांतर्गत भक्ती-शक्ती ते मुकाई चौक या बीआरटी कॉरिडॉरवरील ४५ मीटरनुसार उर्वरित रस्ता विकसित करण्यात येत आहे. महापालिकेचा नगररचना व विकास विभागाच्या मंजूर विकास आराखड्यानुसार रस्त्याचे भूसंपादन विशेष अधिकारी, पिंपरी यांनी दि.१४/१०/२०१८ रोजीच्या निवाड्यानुसार केले होते. भूसंपादनाच्या अनुषंगाने बुधवार (दि. २५) रोजी मूळ मालकांनी अडथळा करून अडवलेल्या अनधिकृत बांधकामे व पत्राशेडवर कारवाई करण्यात आली. पुढे दोन दिवस ही कारवाई सुरू राहणार आहे. कारवाईस ३ पोकलेन, ४ जेसीबी, ५ डंपर सोबत पोलीस शाखेचे ७ महिला कॉंस्टेबल, ११ पुरुष कॉंस्टेबल व १ साहाय्यक पोलीस निरीक्षक तसेच महाराष्ट्र सुरक्षा बलाचे ७ महिला व १३ पुरुष यांचेसह पिंपरी चिंचवड मनपाचे अ क्षेत्रीय कार्यालयाचे अतिक्रमण विभागाकडील १० मजूर कर्मचारी होते. नगररचना विभागाचे २ सर्व्हेअर, उपअभियंता उपस्थित होते.

महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या आदेशानुसार अति. आयुक्त, प्रभारी मुख्य अभियंता यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकारी अभियंता बापूसाहेब गायकवाड, विजय भोजने, उप अभियंता संजय काशीद, सुनील पवार आणि ५ कनिष्ठ अभियंता यांनी कारवाई केली.

# ‘अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष पोलिस ठाण्यांमध्ये स्थापन करा’

## अंमलबजावणी करण्याची मागणी अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पिंपरी-चिंचवड शाखेने निवेदनाद्वारे केली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पोलिस महासंचालक कार्यालयाकडून महाराष्ट्रातील सर्व जिल्हा पोलिस अधीक्षक व विशेष पोलिस महानिरीक्षक यांना प्रत्येक पोलिस ठाण्यात अंधश्रद्धा निर्मूलन, जादूटोणा, ज्येष्ठ नागरिक धोरणानुसार एक कक्ष स्थापन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.



त्यानुसार पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या अखत्यारीतील पोलिस ठाण्यात त्याची अंमलबजावणी करण्याची मागणी अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पिंपरी-चिंचवड शाखेने निवेदनाद्वारे केली आहे. याबाबत निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा, जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत हे कक्ष स्थापन करण्याच्या सूचना आहेत. त्याने कायद्याचा प्रभावी अंमल होईल. सामान्य नागरिकांत जागरूकता येण्यास मदत होईल. त्यामुळे सर्वच ठाण्यांमध्ये कक्ष स्थापन करावे, असे निवेदनात म्हटले आहे.

दरम्यान, जादूटोणाविरोधी कायद्याचे प्रशिक्षण सर्व पोलिस ठाण्यांमध्ये कार्यरत अधिकारी, कर्मचाऱ्यांना देण्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यासंदर्भात अपर पोलिस आयुक्त यांनी सकारात्मक प्रतिसाद देत त्वरित कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. यावेळी पिंपरी-चिंचवड अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते श्रीराम नलावडे, सुभाष सोळंकी, भारत विठ्ठलदास, प्रदीप तासगावकर, विजय सुर्वे आदी उपस्थित होते.

# महापालिकेला स्वत:ची खासगी मालमत्ता समजू नका

## पूरस्थिती अहवाल प्रसिद्ध न करण्याची भूमिका घेणाऱ्या आयुक्त डॉ. राजेंद्र भोसलेंचा स्वयंसेवी संस्थांकडून समाचार

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील पूरस्थिती पाहणी अहवाल प्रसिद्ध करण्याची गरजच काय? असे वक्तव्य करणाऱ्या महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांचा सजग नागरिक मंचाने कडक शब्दांत समाचार घेतला आहे. 'महापालिकेला स्वतःची खासगी मालमत्ता समजू नका,' अशा शब्दात मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी आयुक्तांना सुनावले आहे. पालिका आयुक्तांनी घेतलेल्या अजब भूमिकेचा निषेधदेखील शहरातील स्वयंसेवी संस्थांकडून करण्यात आला आहे.

सिंहगड रोडसह शहरातील विविध भागांत जुलै महिन्यात पूरस्थिती निर्माण का झाली होती, याचा अभ्यास करण्यासाठी महापालिका आयुक्तांनी चार सदस्यांची समिती नेमली होती. या समितीने आपला अहवाल तयार करून तो पालिका आयुक्त डॉ. भोसले यांच्याकडे दिला होता.



सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात हा अहवाल आल्यानंतरही गेल्या तीन आठवड्यांमध्ये त्यावर कोणतीही कार्यवाही न झाल्याने समितीचा अहवाल आयुक्तांच्या टेबलवर धूळखात पडला असल्याचे वृत्त 'लोकसत्ता'ने प्रसिद्ध केले होते. पूरपरिस्थितीचा हा अहवाल पालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावा, अशी मागणी सजग नागरिक मंचाने आयुक्तांकडे केली होती.

महापालिका प्रशासनाने नेमलेल्या समितीचा अहवाल प्रसिद्ध करण्याची मागणी होत असल्याबाबत पालिकेचे आयुक्त राजेंद्र भोसले यांना विचारले असता, त्यांनी हा अहवाल प्रसिद्ध करण्याची गरजच काय? अशी अजब भूमिका घेऊन ही काही चौकशी समिती नव्हती. त्यामुळे या समितीचा अहवाल जाहीर करण्याची आवश्यकता नाही. या अहवालाचा मी अभ्यास करून गरजेनुसार प्रसारमाध्यमांना त्याची माहिती देईन, असे स्पष्टपणे सांगून त्यावर अधिक बोलणे टाळले होते.

महापालिका आयुक्तांनी घेतलेल्या या भूमिकेचा शहरातील स्वयंसेवी संस्थांनी निषेध व्यक्त करून कडक शब्दांत आयुक्तांना सुनावले आहे. 'आपण सनदी नोकर आहात महापालिकेचे मालक नाही', हे लक्षात घेणे आवश्यक आहे. महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी पालिकेचा वेळ, पैसा व साधनसामग्री वापरून हा अहवाल तयार केला आहे. हे सर्व जनतेच्या करांच्या पैशातून झाले आहे. हा अहवाल पुण्यातील जनतेच्या जीवित आणि वित्त याच्याशी संबंधित असल्याने हा अहवाल व त्यानुसार महापालिका करत असलेल्या उपाययोजना यांची संपूर्ण माहिती मिळण्याचा पुणेकर करदात्या नागरिकांना पूर्ण हक्क आहे. पालिकेला स्वत:ची मालमत्ता समजू नका, अशा शब्दांत वेलणकर यांनी आयुक्तांना खडे बोल सुनावले. आता तरी लोकशाही तत्त्वांची बूज राखून ज्या जनतेच्या पैशातून हा अहवाल तयार केला गेला त्या पुणेकर जनतेला हा अहवाल तसेच त्यावरील महापालिकेने केलेली कार्यवाही समजावी, यासाठी हा अहवाल तातडीने पालिकेच्या संकेतस्थळावर टाकावा, अशी मागणीही वेलणकर यांनी केली आहे.

> पालिका आयुक्त नोकर आहेत. मालक नाहीत. हा अहवाल तयार करण्यासाठी अधिकाऱ्यांनी पालिकेचा वेळ, पैसा व साधनसामग्री वापरली. हे सर्व काम करदात्यांच्या पैशातून झाले आहे. पूर कशामुळे आला, हे नागरिकांना समजणे आवश्यक आहे. अहवाल देण्याची गरज काय? असे वक्तव्य पालिका आयुक्तांना शोभणारे नाही.
> - विवेक वेलणकर, सजग नागरिक मंच.

> पूरपरिस्थितीचा अभ्यास करून समितीने अहवाल तयार करण्यास मी स्वत: सांगितले होते. तो काय धोरणात्मक निर्णय नव्हता. त्यामुळे तो जाहीर केला जाणार नाही. अहवालात सुचवलेल्या उपाययोजना केल्या जातील.
> - डॉ. राजेंद्र भोसले, आयुक्त, पुणे महापालिका.

# पुण्यात पावसाने मोडला तब्बल 86 वर्षांचा विक्रम

## गेल्या 24 तासांमध्ये तब्बल 133 मिमी पावसाची नोंद : ऑक्टोबर 2010 नंतर पुण्यात प्रथमच एवढा पाऊस

**पुणे | प्रतिनिधी**

गणपती काळात विश्रांती घेतलेल्या पावसाने गेल्या काही दिवसांपासून जोरदार हजेरी लावली आहे. मंगळवारी दिवसभर पडणाऱ्या पावसाने बुधवारी विक्रम केला. गेल्या २४ तासांत तब्बल १३३ मिमी पावसाची नोंद झाली. यापूर्वी २१ सप्टेंबर १९३८ रोजी १३२.३ मिमी पाऊस पडला होता. त्या खालोखाल २६ सप्टेंबर १९७१ रोजी ११५.३ मिमी, १९ सप्टेंबर १९८३ रोजी ११०.७ मिमी पावसाची नोंद झाली होती. तब्बल ८६ वर्षांनी पावसाने आपला रेकॉर्ड मोडला.

शहर आणि उपनगरात बुधवारी झालेल्या मुसळधार पावसानंतर गुरुवारी (२६ सप्टेंबर) पावसाचा जोर कमी झाला. दुपारनंतर तुरळक सरी पडल्या. दिवसभरात शिवाजीनगरमध्ये फक्त चार मिमी पावसाची नोंद झाली आहे. मंगळवारी काही ठिकाणी पाऊस झाला तर बुधवारी मुंबई, ठाणे, पुण्यासह इतर अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाने दमदार हजेरी लावली. गेल्या २४ तासांमध्ये पुण्यात पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. गेल्या दोन दिवसांपासून पावसाने शहर परिसराला अक्षरशः झोडपले आहे. पावसाने पुण्यातील अनेक सखल भागात पाणी साचले होते. एवढेच काय मुसळधार पावसाच्या इशाऱ्यामुळे पंतप्रधान मोदींना आपला दौराही रद्द करावा लागला. पुण्यात पावसाने रेकॉर्डब्रेक कामगिरी केली आहे.

पुण्यात गेल्या २४ तासांमध्ये तब्बल १३३ मिमी पावसाची नोंद झाली आहे. ५ ऑक्टोबर २०१० नंतर पुण्यात प्रथमच एवढा पाऊस



झाला आहे. संपूर्ण पुणे शहराला मुसळधार पावसाने झोडपून काढले. सायंकाळी अचानकपणे आलेल्या मुसळधार पावसामुळे नागरिकांची मोठी तारांबळ उडाली. अनेक ठिकाणी पाणी साचले. यामुळे लोकांची मोठी गैरसोय झाली. गेल्या २४ तासांमध्ये झालेला पाऊस हा सप्टेंबर महिन्यातील सर्वाधिक पाऊस आहे.

यापूर्वी १९३८ मध्ये १३२.२ मिमी पाऊस झाला होता. म्हणजेच तब्बल ८६ वर्षांनी पावसाने आपला रेकॉर्ड मोडला आहे. पुणे शहरासह जिल्हा आणि पिंपरी-चिंचवड भागात मुसळधार पाऊस झाला. विजांचा कडकडाट, वादळी वारे आणि मेघगर्जनेसह पावसाने हजेरी लावली. गुरुवारी सकाळीदेखील अनेक भागांत पाऊस बरसताना दिसून आला. मुंबई, पुण्यासह सातारा जिल्ह्यातील मायणी येथे ढगफुटीसदृश पाऊस झाला. या पावसामुळे सर्वत्र दाणादाण उडाली असून, मल्हारपेठ-पंढरपूर महामार्गासह अनेक रस्ते अक्षरशः पाण्याखाली गेल्याचे पाहायला मिळते. पावसाने जनजीवन विस्कळीत झाले. या भागातील पिकांचे नुकसानही झाले. पावसाचे पाणी अनेक घरांमध्ये घुसले आहे. घाटमाथा, जिल्हा आणि धरणक्षेत्रांतही समाधानकारक पाऊस पडल्याने धरणे पूर्ण क्षमतेने भरली. गेल्या वर्षी पावसाने ओढ दिली असली, तरी यंदाचा हंगाम चांगला असेल, सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडणार, असे संकेत भारतीय हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) मे मध्ये दिले होते.

हवामानातील अनुकूल घडामोडींमुळे ऑगस्टमध्ये पुण्यामध्ये दहा वर्षांतील सर्वाधिक पावसाची नोंद झाली. ऑगस्ट महिन्यात शहरात २७९ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. जून, जुलै या महिन्यांतही सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडला.

**आजवरचा पाऊस (24 तास, मिमी)**

- २१ सप्टेंबर १९३८ : १३२.३ मिमी
- २६ सप्टेंबर १९७१ : ११५.३ मिमी
- १९ सप्टेंबर १९८३ : ११०.७ मिमी
- २५ सप्टेंबर २०२४ : १३३ मिमी